नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २६/१०/२०२६ (सोमवार)

खंडणी मागणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा नोंद
३ आरोपी अटक

पोलीस स्टेशन रामटेक :— दिनांक २४/१०/२०२६ रोजी रात्री फिर्यादी राजु रतनलाल मडावी, वय २१ वर्षे, रा. कांद्री वस्ती, मनसर यांचा मामा विजय धुर्वे यांनी फोन करून सांगितले की, त्यांचा टेम्पो हिवराभेंडे गावाच्या रस्त्यावर अडवून काही इसम २००/— रुपये मागत आहे. त्यानुसार फिर्यादी घटनास्थळी गेले असता आरोपी क्र १) सागर उर्फ शिवशंकर श्रीराम वैद्य, २) सेवक गणबा चुधरी, आणि ३) कृणाल राजहंस बावणे यांनी टेम्पो आरटीओ चेकपोस्ट टाळून पुढे जाऊ देण्यासाठी २००/— रुपयांची मागणी केली. पैसे न दिल्यास टेम्पोची तोडफोड करून हात—पाय तोडण्याची धमकी दिली. तसेच फिर्यादीला हातबुक्क्यांनी मारहाण केली आणि फिर्यादी यांचा खाली पडलेला मोबाईल घेवुन गेले.

फिर्यादीच्या रिपोर्टवरून आरोपी **क्र १) सागर उर्फ शिवशंकर श्रीराम वैद्य, वय ३२ वर्षे, रा. हिवराभेंडे, २) सेवक गणबा चुधरी, वय ४५ वर्षे आणि ३) कृणाल राजहंस बावने, वय २४ वर्षे, दोघे रा. भिलेवाडा, ता. रामटेक, जि. नागपूर** यांच्या विरूध्द कलम ३०८(५), १२६(२), ३०३(२), ११५(२), ३५२, ३५१ व ३(५) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून नमुद **तिन्ही आरोपींना रामटेक पोलीसांनी तात्कळ अटक** केले आहे. पुढील तपास रामटेक पोलीस करीत आहेत.

अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, पारशिवणी पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन पारशिवणी :— दिनांक २५/१०/२०२६ रोजी पारशिवणी पोलीस अवैध धंदयांवर कारवाई कामी पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, **ट्रॅक्टरने अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे.** मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी ट्रॅक्टर शोध कामी सर्तक पेट्रोलींग केली असता तकीया मारोती मंदीर जवळुन एक ट्रॅक्टर ट्रॉली संशयीतरित्या जाताना दिसुन आले. सदर ट्रॅक्टर थांबवुन चालकास पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने आपले नाव **आरोपी क्र १) सुर्यभान महीपतराव तिरकमठे, वय ५० वर्षे, रा. पालोरा, वार्ड क्र. ०१ ता. पारशिवनी, जि. नागपूर** अशी माहीती दिली. पोलीसांनी आरोपीच्या ताब्यातील महीन्द्रा कपंनीचा टॅक्टर क्र. एम एच ४० बीजे ८३८० त्याला जोडलेली ट्रॉली क्र. एम एच ४० डी ई ०८३७ ची तपासणी केली रेती आढळुन आली. पोलीसांनी त्याला अधिक विचारपुस केली असता त्याने **आरोपी क्र २) वाहन मालक खुशाल महादेव बडवाईक, रा. पारशिवनी,ता. पारशिवनी, जि. नागपूर** याच्या सांगण्यावरून पेंच नदी पात्रातुन अवैधरित्या उत्खनन करून रेतीची चोरटी वाहतुक केल्याचे सांगितले

पोलीसांनी पंचासमक्ष ट्रॅक्टर ट्रॉली किंमती ३,५०,०००/—रूपये आणि १ ब्रास रेती किंमती ६०००/— रूपये असा एकुण किंमती ३,५६,००० /—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोस्टे पारशिवणी येथे कलम ३०३(२), ४९ भान्यासं सहकलम ४८(७)(८)महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, सहकलम ४/२१ खाण व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे .

अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्यावर एन.डी.पी.एस कायदयान्वये ३ गुन्हे नोंद

दिनांक २५/१०/२०२६ रोजी पोलीस स्टेशन कन्हान आणि खापा अंतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई करून कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये ३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत आरोपी नामे संदीप सुकई साहानी, वय २२ वर्ष, रा. मढीबाबा, कामठी खदान नं. ०३ कन्हान, ता. पारशिवनी जि. नागपुर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन खापा** अंतर्गत आरोपी १) किसनकुमार अमृतलाल धनकर, वय ३० वर्ष, रा नौकेशा साहसपुर, जि. बेमेतरा आणि २) राहुल राजकुमार सोनटक्के, वय ३० वर्ष, रा वनदेवी नगर, यशोधरा नगर, नागपूर हे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले.

नमुद आरोपीविरूध्द कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये प्रत्येकी १ असे ३ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर ११ गुन्हे दाखल,

दिनांक २५/१०/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ११ गुन्हे दाखल केले.

पोलीस स्टेशन केळवद येथे अशोक तुकाराम दुपारे, वय ५२ वर्ष, रा. गुजरखेडी, ता.जि. पांढुर्णा ह.मु. खुर्सापार ता. सावनेर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे क्रं १) रोशन गणेश धारपुरे, वय ४० वर्ष, रा. कुंभारपुरा, खापा आणि क्रं २) नामदेव दशरथ उईके, वय ३९ वर्ष, रा. पेंढरी, ता. सावनेर, जि. नागपूर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे १) विनोद प्रभाकर भोयर, रा गांगापुर,२) कुनाल शंकर धोटे, रा. दुर्गानगरी, उमरेड,आणि ३) रामु रतीराम पवार, रा. राजुरवाडी, उमरेड,यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद आहे, **पोलीस स्टेशन पारशिवणी** येथे विजय गंगाधर केदार, वय ३१

वर्ष, रा. वार्ड क्र १७ पारशिवनी, ता.पारशिवनी,जि.नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद .**पोलीस स्टेशन देवलापार** येथे १) कमलेश लक्ष्मन ईनवाते, वय ३६ वर्ष, रा. बंजारा पथरई,ता. रामटेक आणि २) नरेंद्र चंद्रभोस पारखी, वय ३६ वर्षे, रा. रयतवाडी, ता. रामटेक यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे १) राजकुमार चैतराम केवट वय ४२ वर्षे रा गांगापुर झोपडपटटी, टाकळघाट, ता. हिंगणा,जि. नागपुर आणि २) पंडीत गेदलाल सावकर, वय ५० वर्ष, रा. खापरी मोरेश्वर, ता.हिंगणा, जि.नागपुर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद .

नमुद कारवाईत एकुण २५२० मिली देशी दारू, ३५ लीटर मोहाफुल दारू, असा एकुण ४,६२०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर